आकाशवाणी मुंबई
प्रादेशिक बातमीपत्र - दुपारी ३.०० वाजता
५ जुलै २०२५ - शनिवार

**ठळक बातम्या**

- मराठीच्या मुद्द्यावर एकजूट कायम राखण्याचं राज ठाकरे आणि उद्धव ठाकरे यांचं आवाहन

- आषाढी एकादशी निमित्त राज्याच्या विविध भागांतून निघालेल्या संतांच्या पालख्या पंढरपुरात दाखल, प्रशासनातर्फे चोख बंदोबस्त

- सुपर युनायटेड रॅपिड अँड ब्लिट्झ बुद्धिबळ स्पर्धेत भारताच्या डी. गुकेशनं पटकावलं विजेतेपद

**आणि**

- अँडरसन-तेंडुलकर करंडक कसोटी क्रिकेटमध्ये दुसऱ्या सामन्यात भारताला २४४ धावांची आघाडी

**<><><><>**

मराठीच्या मुद्द्यावर राज्यातल्या सर्व नागरिकांनी पक्षीय मतभेद दूर करुन एकत्र यावं असं आवाहन राज आणि उद्धव ठाकरे यांनी आज केलं. मुंबईत वरळीत झालेल्या विजयी मेळाव्यात ते बोलत होते. राज ठाकरे यांच्या भाषणानं या मेळाव्याला सुरुवात झाली. ते म्हणाले

**- होल्ड - राज ठाकरे बाइट -**

राज्यातल्या जनतेला आधी भाषेवरून आणि नंतर जातीपातींमध्ये विभागण्याचा डाव असल्याचा दावा राज ठाकरे यांनी केला. इंग्रजी माध्यमातून मुलांनी शिक्षण घेत असल्याच्या मुद्द्याच्या त्यांनी समाचार घेतला. बाळासाहेब ठाकरे आणि श्रीकांत ठाकरे इंग्रजी माध्यमातून शिकले होते, मात्र त्यांच्या मराठीच्या प्रेमावर कुणालाही शंका घ्यायला जागा नव्हती, याकडे त्यांनी लक्ष वेधलं. त्यामुळं भाषेचा अभिमान बाळगण्यासाठी कुठल्या भाषेत शिक्षण घेतलं हे महत्त्वाचं नाही, असं ते म्हणाले. त्याचवेळी भाषेच्या मुद्द्यावरुन उगाच मारहाण न करण्याचा सल्ला त्यांनी कार्यकर्त्यांना दिला. भाषणाच्या शेवटी त्यांनी मराठी, मराठी भाषा, मराठी माणूस या मुद्द्यावर तडजोड होणार नाही, हे स्पष्ट केलं.

त्यानंतर भाषणाला आलेल्या उद्धव ठाकरे यांनी भाषणापेक्षा एकत्र दिसणं महत्त्वाचं आहे, असं म्हणून सुरुवात केली.

**- होल्ड - उद्धव ठाकरे -**

राजकारण्यांनी आतापर्यंत मराठी माणसांना वापरलं आणि फेकून दिलं. संकटात मराठी माणून एकत्र येतो आणि संकट गेल्यावर एकमेकांशी भांडतो, या पुढे अशा डावांना बळी पडू नका, सर्व पक्षातल्या मराठी माणसांनी एकत्र यावं असं आवाहन उद्धव ठाकरे यांनी केलं.

आम्ही कुठल्याही भाषेच्या विरोधात नाही मात्र सक्तीच्या विरोधात आहेत. त्यामुळं कोणावर दादागिरी करणार नाही पण दादागिरी केली तर ती सहन करणार नाही, असा इशारा सुद्धा त्यांनी दिला. महाविकास आघाडी सरकारच्या काळात मराठीची सक्ती केली, मराठी भाषा भवनाचं भूमीपूजन केलं, या गोष्टी पुढे खोळंबल्या, असा दावा त्यांनी केला.

सुमारे २० वर्षांनंतर ठाकरे बंधू व्यासपीठावर एकत्र आले असल्यानं राज्यभरातल्या नागरिकांनी या मेळाव्याला गर्दी केली होती.

उद्धव आणि राज ठाकरे दोन्ही बाजूंनी व्यासपीठावर एकत्र दाखल झाले आणि उपस्थितांना अभिवादन केलं तेव्हा उपस्थितांनी जल्लोष केला. या मेळाव्याला राष्ट्रवादी शरदचंद्र पवार पक्षाच्या खासदार सुप्रिया सुळे, आमदार जितेंद्र आव्हाड, शेकापचे जयंत पाटील, माकपचे अजित नवले, भाकपचे प्रकाश रेड्डी, राष्ट्रीय समाज पक्षाचे महादेव जानकर, माजी खासदार भालचंद्र मुणगेकर, मराठी अभ्यास केंद्राचे दीपक पवार यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते. ठाकरे कुटुंबीय, मराठी चित्रपट सृष्टीतल्या अनेक मान्यवरांनी मेळाव्याला हजेरी लावली.

**<><><><>**

मराठी भाषेच्या नावाखाली उद्धव ठाकरे यांनी आपली सत्ता गेल्याचं शोकगीत गायल्याची टीका राज्याचे महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी केली आहे. उद्धव ठाकरे मुख्यमंत्री असताना पहिलीपासून हिंदी सक्तीचा अहवाल का स्वीकारला याचं उत्तर त्यांनी दिलंच नाही, असंही ते यावेळी म्हणाले. मराठी भाषेचं प्रेम धोरणात दिसलं पाहिजे, असं म्हणताना ठाकरे यांची ही भूमिका महापालिका निवडणुकांसाठीची असल्याची टीकाही बावनकुळे यांनी समाज माध्यमावर केली.

<><><><>

आषाढी एकादशी निमित्त राज्याच्या विविध भागांतून निघालेल्या संतांच्या पालख्या आता पंढरपुरात दाखल होत आहेत. संत ज्ञानेश्वर महाराजांची पालखी वाखरी इथं मुक्कामी असून संत तुकाराम महाराज, सोपान काका महाराज, संत मुक्ताई, संत गजानन महाराज यांच्या पालख्या पंढरपूर जवळ पोहोचल्या आहेत. यंदाच्या आषाढी वारीसाठी पंढरपुरात वीस लाख भाविक येतील असा प्रशासनाचा अंदाज आहे. एकादशीपूर्वीच पंढरपुरात दहा लाख भाविक दाखल झाले आहेत. पंढरपुरात, नगर प्रदक्षिणा मार्ग, नामदेव पायरी, विठ्ठल मंदिर परिसर गर्दीनं फुलून गेला आहे. तर मंदिरामध्ये फुलांची आकर्षक सजावट करण्यात आली आहे. पंढरपूर शहरात पालिकेनं स्वच्छतेच्या दृष्टीनं तब्बल साडे सोळाशे कर्मचारी नियुक्त केले आहेत. याठिकाणी वारकरी तसंच भाविकांच्या होणाऱ्या गर्दीच्या पार्श्वभूमीवर प्रशासनातर्फे चोख बंदोबस्त ठेवण्यात आला आहे.

<><><><>

मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेतील सर्व पात्र लाभार्थ्यांना जून महिन्याचा सन्मान निधी वितरित करण्याची तांत्रिक प्रक्रिया कालपासून सुरू करण्यात आली आहे. महिला आणि बालविकास मंत्री आदिती तटकरे यांनी समाज माध्यमावरील आपल्या संदेशाद्वारे ही माहिती दिली. योजनेच्या सर्व पात्र लाभार्थ्यांच्या आधार कार्डाशी सलग्न बँक खात्यात उद्यापासून हा सन्मान निधी जमा होणार असल्याचं त्यांनी म्हटलं आहे.

<><><><>

क्रोएशिया इथं सुरू असलेल्या सुपर युनायटेड रॅपिड अँड ब्लिट्झ बुद्धिबळ स्पर्धेत भारताच्या डी. गुकेशनं विजेतेपद पटकावलं आहे. या स्पर्धेत गुकेशनं अंतिम फेरीत अमेरिकेच्या वेस्ली सो चा पराभव केला. १८ पैकी १४ गुण मिळवून गुकेशनं रॅपिड फॉरमॅट मध्ये पहिलं स्थान पटकावलं. पोलंडचा जान क्रिजस्टोफ दुडा दुसऱ्या स्थानावर असून माजी विश्वविजेता, नॉवेचा मॅग्नस कार्लसन तिसऱ्या स्थानावर आहे. भारताचा प्रज्ञानंद देखील या स्पर्धेत सहभागी असून तो फॅबियानो कारुआनासमवेत संयुक्तपणे चौथ्या स्थानावर आहे.

<><><><>

जॉर्जियातल्या बटुमी इथं आजपासून बुद्धिबळ फिडे महिला विश्वचषक स्पर्धा सुरू होत आहे. भारताच्या ९ महिला बुद्धिबळपटू यात सहभागी होणार आहेत. कोनेरू हम्पी, हरिका द्रोणवल्ली, आर वैशाली आणि दिव्या देशमुख यांनी त्यांच्या फिडे रेटिंगच्या आधारे स्पर्धेच्या दुसऱ्या फेरीसाठी थेट पात्रता मिळवली आहे. तर इतर पाच खेळाडू पहिल्या फेरीपासून सुरुवात करतील.

**<><><><>**

विंम्बल्डन टेनिस स्पर्धेत आज भारतीय खेळाडूंचे सामने होणार आहेत. पुरुष दुहेरीत आज युकी भांब्री आणि अमेरिकेचा रॉबर्ट गैलोवे यांच्या जोडीचा सामना पोर्तुगालच्या नूनो बोर्गेस आणि अमेरिकेच्या मार्कोस गिरोन या जोडीशी होणार आहे. तर भारताच्या एन.श्रीराम बालाजी आणि मेक्सिकोच्या मिगुएल एंजल रेयेस-वरेला या जोडीचा सामना अर्जेंटिनाच्या होरासिओ झेबालोस आणि स्पेनच्या मार्सेल ग्रॅनोलर्सशी होईल. भारताचा रित्विक चौधरी बोलिपल्ली आणि कोलंबियाचा निकोलस बॅरिएंटोस ही जोडी ब्रिटनच्या जो सॅलिसबरी आणि नील स्कुप्सकी यांच्याशी लढेल.

**<><><><>**

कॅनडा खुल्या बॅडमिंटन स्पर्धेच्या पुरुष एकेरीत भारताच्या किदांबी श्रीकांतनं चमकदार खेळ करत उपांत्यफेरीत प्रवेश केला आहे. श्रीकांतनं जागतिक क्रमवारीत सहाव्या क्रमांकावर असलेल्या चायनीज तैपेईच्या चोऊ टीएन चेन चा केवळ ४३ मिनिटांत २१-१८, २१-९ असा सरळ सेट मध्ये  पराभव केला. उपांत्यफेरीत आज श्रीकांतचा सामना जपानच्या केंटा निशिमोटो बरोबर होणार आहे.

**<><><><>**

बर्मिंगहम इथं सुरू असलेल्या अँडरसन तेंडुलकर करंडक स्पर्धेत दुसऱ्या कसोटी क्रिकेट मालिकेच्या चौथ्या दिवशी आज भारत आपला दुसरा डाव खेळणार आहे.

इंग्लंडनं पहिल्या डावात ४०७ धावा केल्या. यात मोहम्मद सिराजनं सहा आणि आकाश दीपने चार बळी घेतले. इंग्लंडच्या जेमी स्मिथने नाबाद १८४ धावा तर हॅरी ब्रूकने १५८ केल्या.

तिसऱ्या दिवसअखेर काल भारतानं दुसऱ्या डावात इंग्लंडविरुद्ध २४४ धावांची आघाडी घेतली असून, केएल राहुल २८ आणि करुण नायर ७ धावांवर खेळत आहेत. आजच्या दिवसाचा खेळ भारतीय प्रमाणवेळेनुसार दुपारी साडेतीन वाजता सुरू होईल.

**<><><><>**

आपला देश सध्या अमृतकाळात असून भारतीय स्वातंत्र्याच्या शताब्दीकडे वाटचाल करत आहे, या प्रवासाचा एक भाग होणं ही आपल्यासाठी सन्मानाची बाब आहे, असं सरन्यायाधीश भूषण गवई यांनी म्हटलं आहे.

ते आज मुंबईतल्या राष्ट्रीय विधी महाविद्यालयात आयोजित “डॉ बाबासाहेब आंबेडकर यांचा कणखर वारसा” याविषयावर आयोजित कार्यक्रमात बोलत होते.

**<><><><>**

कोकण आणि मध्य महाराष्ट्रात काही ठिकाणी आज जोरदार ते अति जोरदार पाऊस पडेल असा हवामान विभागाचा अंदाज आहे. रत्नागिरी जिल्ह्यातल्या जगबुडी नदीनं आणि रायगड जिल्ह्यातल्या कुंडलिका नदीनं धोक्याची पातळी ओलांडली आहे. त्यामुळे नदी पात्राजवळच्या गावांना धोक्याची सूचना देण्यात आली आहे. रायगड, रत्नागिरी, आणि सिंधुदुर्ग जिल्ह्यासाठी तसंच पुणे, सातारा आणि कोल्हापूरच्या घाट परिसराला हवामान विभागानं उद्यापर्यंत ऑरेंज अलर्ट जारी केला आहे.

**//<><><><>//**